


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे    अंक : १५७ वा शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मुलांना हिंदी शिकवतायत, पण बाहेरच्यांना मराठी शिकवण्याचा विचार नाही, राज ठाकरे बरसले

**वृत्तसंस्था/रायगड**

शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हजेरी लावली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे लहान मुलांना हिंदी कसं शिकवता येईल, याचा विचार करतात, पण महाराष्ट्रात जे कामधंद्याला येत आहेत, त्यांना मराठी कशी येईल, याचा विचार न करणं दुर्दैवी असल्याचं राज ठाकरे यावेळी म्हणाले. अंगात ताकद नव्हती, मात्र तुमच्या आणि जयंत रावांच्या प्रेमाखातर इथे आलो. पावसाळा कमी झाला की पनवेलमध्ये सभा घेईन. काय झालंय ते डॉक्टर हल्ली सांगत नाहीत. पूर्वीचे आजार ताठ मानेने नाव सांगून समोर यायचे. हल्लीचे आजार आणि महाराष्ट्राचं राजकारण फार वेगळं नाही. हा या पक्षातून त्या पक्षात गेला, तो त्या पक्षातून या पक्षात आला, आपण म्हणतो काय झालं, तर तो व्हायरल झाला. असे हे व्हायरल खूप झालेत, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला. जयंत राव म्हणाले फक्त मराठीवर बोला. शेकापच्या व्यासपीठावर मी पहिल्यांदा नाही, तर दुसऱ्यांदा येतोय. पाच वर्षांपूर्वी मी लोकसभेच्या प्रचारालाही आलो होतो, याची आठवण राज ठाकरेंनी करुन दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे राज्यातील मुलांना हिंदी कसं शिकवता येईल, याचा विचार करत आहेत. पण महाराष्ट्रात जे कामधंद्याला येतात, त्यांना मराठी कशी येईल, याचा विचार नाही करत. महाराष्ट्रातील मराठी माणूस आणि भूमिपुत्रांचा विचारच नाही. याचं विदारक स्वरुप म्हणजे रायगड जिल्हा, असं राज म्हणाले. इथे अनेकांच्या जमिनी चालल्यात, व्यवहार करणारेही आपलेच, त्यामुळे कुंपणच शेत खातंय अशी परिस्थिती. शेतकरीही बरबाद होतोय, उद्योग धंद्यांमध्ये मराठी कामगार नाही तर बाहेरच्या राज्यातील लोक भरती होत आहेत. या पक्षाचं नाव आहे शेतकरी कामगार पक्ष. मग त्याचा काय



उपयोग? असा सवाल राज ठाकरेंनी विचारला. पंतप्रधान असो किंवा या देशाचे गृहमंत्री, दोघंही गुजराती आहेत. ते ठणकावून सांगतात की मी हिंदी भाषिक नाही मी गुजराती आहे. राज्यातले अनेक प्रकल्प गुजरातला गेले. मी विचारलं गुजरातमध्ये आहे का हिंदी? नाही, मग महाराष्ट्रात का आणता? तुमची जमीन गेली की तुम्हाला स्थान नाही. तुम्ही गुजरातला गेलात तर तुम्हाला जमीन विकत घेता येत नाही, असंही राज ठाकरे म्हणाले

# धक्कादायक घटना चाकूने वार करून केला १९ वर्षीय मुलाचा खून....!

**जनसंचलन/बुलढाणा**

दिवसेंदिवस बुलढाणा शहरात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. खून करणे तर एक सोपच झाला असं म्हणावं लागेल. आज दि १ ऑगस्ट रोजी चिखली रोड जवळ असलेल्या नंगारा हॉटेल समोर एका अपार्टमेंट जवळ चाकूने वार करून १९ वर्षीय मुलाची हत्या करण्यात आली आहे.



सनी सुरेश जाधव (१९) रा. गौतम नगर बुलढाणा असे मृतक मुलाचे नाव आहे. या घटनेमुळे बुलढाणा शहरात खळबळ उडाली आहे.

काही कारणास्तव सनी जाधव याचे एका मुलाशी वाद झाला होता दरम्यान अज्ञात आरोपीने सनी जाधव याच्या पोटावर व छातीवर चाकूने सपासप वार केले. त्यामुळे सनी जाधव हा जागेवरच कोसळला. रक्तस्राव खूप झाल्यामुळे यामध्ये त्याचा दुर्दैव मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळतात शहर पोलीस स्टेशनची पोलीस अधिकारी घटनास्थळीत दाखल झाले व पंचनामा करून मृतदेह हा जिल्हा सामान्य रुग्णालय येथे हलविण्यात आला आहे सदर घटनेचा पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

# हातात कोयता घेऊन दोघांची सोशलगिरी; गुन्हा दाखल!

**जनसंचलन/बुलढाणा**



हातात कोयता घेऊन दुचाकीवर फिरत असलेला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करणे, दोन युवकांना चांगलेच महागात पडले. बुलढाणा शहर पोलिसांच्या सोशल मीडिया सेलच्या लक्षात हा व्हिडिओ येताच, संबंधित दोघांविरुद्ध शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये ३० जुलै रोजी दोन युवक हातात लोखंडी कोयता घेऊन दुचाकीवर फिरताना दिसतात. त्यांनी हा व्हिडिओ रिल्स स्वरूपात बनवून सोशल मीडियावर प्रसारित केला होता. पोलिस अधीक्षक कार्यालयातील सोशल मीडिया सेलच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर, पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. ३१ जुलै रोजी पोलिसांनी व्हिडिओतील व्यक्तींची ओळख पटवन अमित सनील बेंटताल तिरा २३, रा. वार्ड क्रमांक १, नगरपरिषदेच्या मागे, बुलढाणा) आणि आदित्य उर्फ शक्ती संजय देशमुख (वय २३, रा. शिवराज नगर, बुलढाणा) या दोघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्यांच्या ताब्यातून लोखंडी कोराता पंचासमक्ष जप्त करण्यात आला

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आर्थिक समावेशन व बँक-मित्र

## संपादकीय लेख

आजचे युग हे वित्तीय भांडवलाचे आहे. या पार्श्वभूमीवर जगभरातील सर्वच देशांनी आर्थिक समावेशकतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. या संकल्पनेमागील मूलभूत उद्दिष्ट असे होते, की प्रत्येक सज्ञान व्यक्तीचे बँकेत खाते असावे आणि त्या खात्यामार्फतच त्याचे सर्व आर्थिक व्यवहार पार पडावेत. विकसनशील; तसेच आर्थिक मागास देशांना हे अद्याप आवश्यक तेवढे साध्य करता आलेले नाही. भारतातील आर्थिक समावेशन चळवळीची सुरुवात १९६९मध्ये १४ मोठ्या खासगी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामधून झाली. त्यानंतर, १९७५मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. यामागील प्रमुख उद्देश होता, ग्रामीण भागातील जनतेला बँकिंग व्यवस्थेत सामावून घेणे व त्यांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणणे. यानंतर, १९८०मध्ये आणखी सहा खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून हीच प्रक्रिया पुढे नेण्यात आली. मात्र, उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष उपलब्धता यामध्ये मोठी दरी कायम होती. ही दरी भरून काढण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने २००५मध्ये ङ्गआर्थिक समावेशनफहे धोरणात्मक उद्दिष्ट म्हणून स्वीकारले. त्या काळात देशातील केवळ ४० टक्के सज्ञान व्यक्तींचीच बँकेत खाती होती. देशभर बँकांच्या शाखा सर्वदूर उघडण्याची गरज होती; परंतु व्यवसायाची क्षमता, व्यवहार्यता आणि खर्च-अर्जनाचा मुद्दा लक्षात घेता, पारंपरिक शाखा उघडणे सर्वत्र शक्य नव्हते. यावर पर्याय शोधताना सन २००६मध्ये ङ्गबँकिंग करस्पॉन्डंटफ म्हणजेच ङ्गबँक मित्रफ ही संकल्पना उदयास आली. यामुळे बँकिंग व्यवस्थेच्या दारापर्यंत न पोहोचलेल्या लाखो लोकांना ङ्गदारे बँकेची-सेवा गावाचीफ हे ध्येय प्रत्यक्षात अनुभवता आले. २००९मध्ये डॉ. सी. रंगराजन समितीने आर्थिक समावेशन विषयावर एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध केला. तथापि, त्याकाळी बहुतांश बँकर्स या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने पाहत नव्हते. मात्र, ऑगस्ट २०१४मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ङ्गप्रधानमंत्री जन-धन योजनाफ जाहीर केली आणि त्याद्वारे आर्थिक समावेशनाला राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च प्राथमिकता प्राप्त झाली. या योजनेच्या प्रभावामुळे गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने आर्थिक समावेशनाच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे. आज भारतातील एकूण सज्ञान व्यक्तींमध्ये सुमारे ८० टक्के लोकांची बँक खाती उघडली गेली आहेत. सर्वप्रथम, सर्व नागरिकांची बँक खाती उघडण्यात आली. त्यानंतर ही खाती आधार क्रमांकाशी जोडली गेली. पुढे या खातेदारांना ङ्गरुपेफ डेबिट कार्ड देण्यात आले. त्यानंतर त्यांना ङ्गप्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनाफ व ङ्गप्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजनाफ या विमा योजनांचे वित्तीय संरक्षण देण्यात आले. या योजनांनंतर, वृद्धावस्थेत आधार मिळावा म्हणून ङ्गअटल पेन्शन योजनाफ लागू झाली. हे सगळे घडत असताना, कोअर बँकिंग सोल्युशनच्या (सीबीएस) माध्यमातून देशातील सर्व बँका एकमेकींशी जोडल्या गेल्या. त्यामुळे पेमेंट आणि सेटलमेंट यंत्रणा अधिक गतिमान आणि सुलभ झाली. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजेच, भारताने आर्थिक समावेशनाच्या क्षेत्रात एक अद्वितीय प्रगती साधली. याचमुळे सरकारला ङ्गडायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरफ (डीबीटी) या यंत्रणेद्वारे अनुदान, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत इत्यादी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचवणे शक्य झाले. या आर्थिक समावेशनाच्या प्रवासात ङ्ग बँक-मित्र म हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणारे घटक आहेत. संपूर्ण योजनेचा भार त्यांच्या खांद्यावर आहे; कारण तेच प्रत्यक्षात गावोगावी जाऊन नागरिकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचवत आहेत. मात्र, हेच बँक-मित्र आज सर्वार्थाने दुर्लक्षित राहिले आहेत आणि हेच ते मुख्य कारण आहे, की गेल्या दोन वर्षांत बँक-मित्रांची संख्या ८,६२,६७९ एवढी घटली आहे. ही घसरण हे स्पष्टपणे दर्शवते, की आर्थिक समावेशनाची ही योजना आता उलट्या दिशेने प्रवास करत आहे. त्याचा अर्थ असा, की ६७ टक्के भागांतील जनतेला ज्या बँकिंग सेवा आपल्या गावात, अगदी आपल्या दारात मिळत होत्या, त्या सेवा आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. योजना तर चालू आहे; पण बँक-मित्र टिकून न राहिल्यास ही संकल्पनाच अपूर्ण ठरेल. बँक-मित्रांच्या उत्पन्नाची हमी नाही, सामाजिक सुरक्षितता नाही, कामाचे निश्चित तास नाहीत, प्रशिक्षण व मान्यता व्यवस्थेचा अभाव आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बँका स्वतः बँक-मित्रांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने करत होत्या. आता, बहुतेक बँका या नेमणुका मध्यस्थ कंपन्यांच्या माध्यमातून करतात. ज्या ठिकाणी एका बँक-मित्राला पुरेसे उत्पन्न मिळत नाही, तेथे चार-चार बँक-मित्रांची नेमणूक केली जात आहे. या नेमणुकांची प्रक्रिया, कमिशनचे निकष, कामाचे



स्वरूप आदी कुठल्याच बाबतीत ठोस निश्चिती अथवा सुसूत्रता नाही. त्यांना ना सेवेत सुरक्षितता आहे, ना निश्चित कामाचे तास, ना रजा, ना वैद्यकीय सुविधा, ना इतर कोणत्याही सवलती. ही समस्या केवळ बँक-मित्रांचीच नाही, तर संपूर्ण आर्थिक समावेश योजनेच्या यशासाठी एक गंभीर अडथळा बनली आहे. या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सरकारने सर्व संबंधित घटक - केंद्र सरकार, बँकर्स, रिझर्व्ह बँक, राज्य अग्रणी बँका, नाबार्ड, बँक-मित्र संघटना आणि राज्य सरकार यांना एकत्र घेऊन दीर्घकालीन व ठोस उपाययोजना आखाव्यात. बँक आणि बँक-मित्र यांच्यामधील मध्यस्थ संस्थांना बाजूला सारणे, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रक्रिया निश्चित करणे, बँक-मित्रांची भूमिका, कार्यक्षेत्र व जबाबदाऱ्या स्पष्टपणे ठरवणे, त्यांच्या कमिशनमध्ये लक्षणीय सुधारणा करणे, त्यांना सेवा सुरक्षितता व सामाजिक संरक्षण देणे, या सगळ्या गोष्टी अत्यावश्यक आहेत. अशा व्यापक आणि समन्वित प्रयत्नांतूनच आर्थिक समावेशनाला योग्य दिशा मिळू शकते आणि बँक-मित्रांच्या खऱ्या योगदानाला मान्यता आणि स्थैर्य प्राप्त होऊ शकते.

# धनंजय मुंडे दोन वेळा नाही तर तीनदा भेटले, देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली

**वृत्तसंस्था/ पुणे**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या तीन दिवसांमध्ये प्रचंड घडामोडी घडल्या. राज्यात काही वादग्रस्त मंत्र्यांवरुन विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा मंत्र्यांवर कारवाईचा बडगा उचलण्याच्या तयारीत होते. तसेच राज्य मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार असल्याची चर्चा सुरु होती. मंत्रिमंडळात आणखी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती. याच दरम्यान माजी मंत्री धनंजय मुंडे हे चांगलेच सक्रिय झालेले बघायला मिळाले. त्यांनी सलग दोन दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यामुळे धनंजय मुंडे हे मंत्रिपदासाठी लॉबिंग तर करत नाहीत ना? अशी चर्चा रंगली होती. मंत्री माणिकराव कोकाटे हे वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. त्यांचा विधीमंडळात रम्मी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यामुळे त्यांचं मंत्रिपद जाईल, अशी चर्चा होती. त्यात धनंजय मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी घेतल्या. यामुळे धनंजय मुंडे यांना कृषीमंत्रीपद मिळतं की काय? अशी चर्चा सुरु होती. पण तसा निर्णय झाला नाही. विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांनी दोन वेळा नाही तर तीनवेळा आपली भेट घेतली होती, असा खुलासा स्वतः देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. पण त्यांच्या भेटीवेळी मंत्रिमंडळाबाबत चर्चा झाली नाही तर वेगळ्या मुद्द्यांवर चर्चा झाली, असा खुलासा देवेंद्र फडणवीस यांनी केला. दरम्यान, अजित पवार यांच्या एका वक्तव्यामुळे धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात येतील, अशी चर्चा सुरु होती. विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली होती. मुडेंनी फक्त एकदाच नव्हे तर दोन वेळा देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं होतं. धनंजय मुंडे यांना कृषी खात्यातील कथित घोटाळा प्रकरणात कोर्टाकडूनही दिलासा मिळाला होता. त्यामुळे त्याचं मंत्रिमंडळात कमबॅक होईल, अशी चर्चा होती. पण खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही चर्चा फेटाळली आहे. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घेण्याची कोणतीही चर्चा नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट म्हटलं आहे. तसेच मंत्रिमंडळाची चर्चा धनंजय मुंडेंच्या स्तरावर होत नाही, असंदेखील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. धनंजय मुंडे यांनी तीनवेळा माझी भेट घेतली आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी भेट घेतली आहे. कुठल्याही भेटीत मंत्रिमंडळाबाबत चर्चा झालेली नाही. मंत्रिमंडळाची चर्चा ही धनंजय मुंडे यांच्या स्तरावर होत नाही. मंत्रिमंडळाची चर्चा मी, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतोङ्घङ्घ, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी त्यानी मंत्र्यांना दिलेल्या इशाऱ्याबाबतही माहिती दिली. ङ्गङ्गकोणीही अशाप्रकारे बेशिस्त वर्तवणूक करेल तर त्यांना सगळ्यांना आम्ही तिघांनी सांगितलं आहे की, हे खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई होईलङ्घङ्घ, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बेशिस्तपणा चालणार नाही! फडणवीसांची वाचाळ मंत्र्यांना तंबी; कठोर कारवाईचा इशारा...

**नागपूर:** राज्यात कुणीही केलेली बेशिस्त वर्तणूक खपवून घेतली जाणार नाही, कठोर कारवाई केली जाईल, अशी तंबी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाचाळवीर व वादग्रस्त मंत्र्यांना दिली.मावळते कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांचे शेतकऱ्यांबद्दलचे वक्तव्य, मोबाइलवर रमी खेळतानाचा व्हायरल झालेला व्हिडीओ तसेच, संजय शिरसाट, संजय गायकवाड हे मंत्रीदेखील वादग्रस्त ठरले. काही मंत्र्यांवरील आरोपांमुळे सरकारला



विरोधी पक्षाने लक्ष्य केले. या पार्श्वभूमी कोकाटे यांचे खातेही बदलण्यात आले. मंत्रिमंडळातील खांदेपालटाकडे लक्ष वेधले असता, घडलेल्या घटनेमुळे मोठा रोष होता. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर आम्ही निर्णय घेतला.कोकाटे यांचे खाते बदलवून दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आले. सद्यस्थितीत आणखी कुठले बदल होतील अशी चर्चा नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले. धनंजय मुंडे यांनी तीनवेळा माझी भेट घेतली. पण, मंत्रिमंडळाबद्दल चर्चा झाली नाही. मंत्रिमंडळाची चर्चा मुंडे यांच्याशी नाही, तर आपल्यासह अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पातळीवर होते, असे फडणवीस म्हणाले. दरम्यान, तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या सरकारने भगवा दहशतवाद म्हटले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा ध्वजही भगवा असल्याचे त्यावेळी आठवले नाही का? भगवा, हिंदू किंवा सनातन यांच्यात कुठलाही भेद नाही. सर्व एक आणि राष्ट्रप्रेमी, राष्ट्रवादी व राष्ट्रीय विचारांनी प्रेरित आहेत, असा टोलाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना लगावला.

## चार दशके चाललेल्या आंदोलनाला यश; कोल्हापुरात उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरु होणार...

**कोल्हापूर :** तब्बल चार दशके सुरु असलेला कोल्हापुरात सर्किट बेंच स्थापनेचा लढा अखेर यशस्वी झाला आहे. कोल्हापूरसह महाराष्ट्राच्या पश्चिम भागातील नागरिकांसाठी ऐतिहासिक क्षण ठरावा, अशी घटना १८ ऑगस्ट २०२५ रोजी घडणार आहे. कोल्हापूरकरांच्या मागणीला आता प्रत्यक्ष फळ मिळणार असून, मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच कोल्हापुरात कार्यान्वित होणार आहे. याबाबतची अधिकृत अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सोलापूर या जिल्ह्यांतील हजारो प्रलंबित प्रकरणांवरील सुनावणी आता स्थानिक पातळीवर होणार असून, त्यामुळे न्यायप्रक्रिया अधिक जलद व सुलभ होणार आहे. कोर्टाच्या कामकाजासाठी सध्या छत्रपती प्रमिला राजे (सीपीआर) रुग्णालया समोरील इमारतीची दुरुस्ती करण्यात येत आहे. भविष्यात यासाठी स्वतंत्र न्यायालयीन संकुल उभारले जाण्याची शक्यता आहे.या ऐतिहासिक टप्प्याच्या मागे कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशन, विविध वकील संघटना, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि सामान्य जनतेचा मोठा वाटा आहे. गेल्या काही दशकांपासून कोल्हापुरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ



व्हावे, या मागणीसाठी सुरु असलेल्या एकात्म लढ्याला अखेर न्याय मिळाला असून, कोल्हापूर शहरात आणि परिसरात सध्या आनंदोत्सव साजरा केला जात आहे. कोल्हापूरमध्ये पूर्वी इंग्रजांनी कोर्ट खंडपीठ चालवले होते, पण देश स्वातंत्र्यानंतर तिथले कामकाज बंद झाले, त्यामुळे कोल्हापुरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू होण्याची मागणी तब्बल ४० वर्षांपासून होत होती. कारण कोल्हापुरासह सहा जिल्ह्यांतील नागरीकांना मुंबई उच्च न्यायालयात न्याय मागण्यासाठी मोठ्या अंतरापर्यंत जावे लागायचे. या सहा जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सोलापूर येतात. या भागातील प्रलंबित आणि नव्याने दाखल होणाऱ्या खटल्यांची संख्या मोठी असून, न्याय मिळवण्यासाठी वेळ, खर्च आणि श्रम अधिक लागत होते.

## सिगारेटनं काळा धंदा उघडकीस, छत्रपती संभाजीनगरातील बनावट नोटांचा छापखाना उद्ध्वस्त, ८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज एमआयडीसीमधील साजापूर क्रांतीनगर भागात कार्यरत असलेला बनावट नोटा छापणारा छुपा छापखाना अखेर पोलिसांच्या हाती लागला आहे. अहिल्यानगर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५९ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या बनावट ५०० रुपयांच्या नोटा जप्त केल्या असून, सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. एकूण ८८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या घटनेचा तपास पोलिसांनी सुरू करण्याचं कारण ठरलं सिगारेट. २७ जुलैला आंबीलवाडी भागात दोन जण पोलिसांनी ताब्यात घेतली. ते दोघं ५०० रुपयांच्या बनावट रुपयांचा वापर करत सिगारेट खरेदी करत होते. पोलिसांनी बेड्या ठोकत त्यांच्याकडून ८० हजारांच्या बनावट नोटा आणि मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी त्यानंतर छापखान्यावर धाड टाकली. हा छापखाना वाळूंज येथे कार्यरत होता. तेथे बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरली जाणार शाई, कागद इत्यादी साहित्य जप्त केले गेले. यापासून २ कोटी १६ लाखांच्या नोटा तयार




झाल्या असत्या.या प्रकरणी प्रदीप कापरे, सोमनाथ शिंदे, विनोद अर्बट, आकाश बनसोडे, शिवाजी गंगर्डे, अनिल पवार यांना अटक केली असून मुख्य सुत्रधार अंबादास ससाणे फरार आहे. फरार आरोपीचा शोध पोलिसांकडून करण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी तीन आरोपी छत्रपती संभाजीनगरात बनावट नोटा तयार करण्याचे काम करत होते. तर प्रदीप कापरे हा बनावट नोटा विक्रीसाठी घेऊन जात असे. या टोळीने ५० हजार रुपये देत १ लाखांच्या नोटा दिल्या होत्या.या टोळीला बाजारात मोठ्या प्रमाणात बनावट नोटा वितरित करायच्या होत्या आणि त्यातून माल कमवयाचा त्यांचा इरादा होता. पण पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे आणि सतर्कतेमुळे हे रॅकेट उद्ध्वस्त झाले. आणि आरोपींना गजाआड करण्यात आले. अहिल्यानगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गितेंनी कारवाईचे नेतृत्व केले.

## पुणे शहरात वाहतूक विभागाचा मोठा निर्णय; तीन प्रकारच्या गाड्यांना शनिवार आणि रविवार आता...

**पुणे :** शहरातील रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा ताण कमी करण्यासाठी आणि बांधकामासाठी आवश्यक असलेल्या जड वाहनांना नियंत्रित स्वरूपात परवानगी देण्यासाठी वाहतूक विभागाकडून अवजड वाहनांच्या वाहतुकीवरील निर्बंध सशर्त शिथिल करण्यात आले आहे. नवीन आदेशानुसार शनिवारी आणि रविवारी बांधकामाशी संबंधित वाहनांना शहरात वाहतुकीची परवानगी असणार आहे. वाहतूक पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी तात्पुरता आदेश काढला असून, हा बदल प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. याबाबत अंतिम निर्णय नंतर घेतला जाणार आहे. बांधकामाशी संबंधित डंपर, रेडी मिक्स कॉंक्रीट मिक्सर अशा जड वाहनांना वाहतुकीसाठी परवानगी असेल.

# परीक्षेसाठी मुलांची तयारी करून घेणे या वर्षी आवश्यक

महामारीच्या काळात बंद झालेल्या शाळा पुन्हा सुरू झाल्या असल्या, तरी मुलांपुढे प्रश्न आहे तो लेखनाची सवय गेल्याचा.ऑनलाइन अभ्यासात लेखन फार करावे लागत नसल्यामुळे लिहिण्याचा सराव गेला आणि आता प्रत्यक्ष वर्गात बसून प्रश्नांची उत्तरे लिहावयाची असल्यामुळे अनेक मुलांना ताण आला आहे. नव्यानेच शाळेत दाखल झालेल्या मुलांची तर शाळेत जाण्याची सवय करण्यापासून तयारी करावी लागेल. ही मुले ऑनलाइन अभ्यासाला सरावलेली असली, तरी प्रत्यक्ष शाळेचा अनुभव त्यांना आता येऊ लागला आहे. इयत्ता दुसरीत असलेल्या एका मुलाची आई असलेल्या प्रीती म्हणतात, ङ्गपरीक्षा ऑनलाइन द्यावयाची असते एवढेच माझ्या मुलाला माहिती असले, तरी आता त्याला ऑफलाइन परीक्षा द्यावी लागणार आहे.



शाळेत जाऊन प्रथमच तो पेपर देणार आहे.त्याला सगळे येत असले, तरी ते लिहून मांडणे जमत नसल्यामुळे काय करावे ते कळत नाही. त्याची ऑफलाइन परीक्षा म्हणजे माझीच कसोटी असल्याचे वाटते.फ केवळ प्रीतीच नव्हे, तर अन्य अनेक पालकांपुढील आणि प्रथमच ऑफलाइन परीक्षा देणे हा मुलांपुढील प्रश्न आहे.लिहिण्याचा फार सराव उरलेला नसणे ही मुलांची समस्या आहे. पण सराव नाही हे उत्तर नाही.कारण, परीक्षा द्यावी लागणार आणि त्यात चांगले गुणही मिळवावे लागणार. मुलांची परीक्षेसाठी कशी तयारी करून घ्यावी याबाबत तज्ज्ञांनी काही टिप्स दिल्या आहेत, त्या पाहा.

अवघड विषयांना प्राधान्य : मुलांसाठी काही विषय लिष्ट असतात आणि त्यांची उत्तरे लिहिण्यास अवघड वाटते. तुमच्या मुलांनाही ही समस्या असेल, तर प्रत्येक विषय समजून घ्यावयास हवा याची त्यांना जाणीव द्या. एकदा तो समजल्यावर उत्तर लिहिण्यात अडचण नसते.त्यासाठी पालकांनी मुलांचा रोज दोन तास अभ्यास घ्यावा आणि मुलांना समजण्यास अवघड असलेल्या विषयांसाठी जास्त वेळ द्यावा. कठीण विषय समजावून सांगण्यासाठी रोज किमान अर्धा तास तरी देणे गरजेचे आहे. विषय केवळ समजावून सांगू नका, तर परीक्षेत त्याचे उत्तर कसे लिहावे याचा सरावही करून घ्यावा. सरावातील प्रश्नोत्तरांचे स्वरूप परीक्षेतील प्रश्नोत्तरांप्रमाणे ठेवलेत, तर मुलांना आत्मविश्वास येतो.

खोली व्यवस्थित ठेवा : मुलांचा अभ्यास घेत असलेली खोली व्यवस्थित असणेसुद्धा गरजेचे असते. मुलांचे शाळेचे दप्तर, त्यातील पुस्तके आणि वह्यांची मांडणी क्रमानुसार करा. टेबलखुर्चीवर बसून अभ्यासाची सवय असेल तर फारच चांगले. टेबल-खुर्चीमुळे आपण शाळेच्या वर्गात बसून अभ्यास करत असल्याचा भास मुलांना होतो आणि ती मनापासून शिकतात. यामुळे त्यांना नियमित अभ्यासाची सवयही होते.

जुन्या प्रश्नपत्रिका : मुले लहान असोत वा मोठी; ती शिकत असलेल्या इयत्तेतील जुन्या प्रश्नपत्रिका त्यांना सरावासाठी उपयोगीपडतात.या प्रश्नपत्रिका सोडविण्यास सांगणे म्हणजे त्यांना लेखनाचा सराव होणे. जुन्या प्रश्नपत्रिका मिळत नसतील, तर वरच्या इयत्तेत गेलेल्या मुलांना विचारून प्रश्नांची कॉपी तयार करा आणि ती मुलांना सोडविण्यास द्या. प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी असलेल्या वेळेतच उत्तरे लिहिण्यास मुलांना सांगा. त्यामुळे त्यांना लेखनाचा चांगला सराव होईल. प्रश्नपत्रिका सोडविण्यास लागत असलेल्या वेळेमुळे मुलांची लेखनाची गती किती आहे, ती किती वाढवावी लागेल हे समजते. यातून मुलांच्या मनातील लेखनाची भीती जाऊन प्रत्यक्ष परीक्षेत त्यांचे लेखन सहजपणाने होते.

वाचनालासुद्धा हवे महत्त्व : मुलांना अभ्यासासाठी प्रेरित करावयाचे असेल, तर त्यांना वाचनाची सवय लावायला हवी. त्यांच्या स्टडी प्लॅनमध्ये वाचनाचा समावेश करा. रोज वेगवेगळ्या विषयांचे वाचन केल्यामुळे मुलांच्या शब्दसंग्रहात भर पडत जाते आणि हेच शब्द त्यांना परीक्षेत प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास मदत करतात. केवळ पुस्तकी शब्द न वापरता मुले त्यांचे म्हणणे त्यांच्या शब्दांत मांडू शकतील.

शुद्धलेखनाकडे द्या लक्ष : लहानपणी आपल्या सगळ्यांना शुद्धलेखनाबाबत पालकांनी वारंवार सांगितले होते आणि आता आपण तेच मुलांना सांगायला हवे. लेखन ही कला आहे हे लक्षात घेऊन मुलांना शुद्धलेखनाकडे लक्ष देण्यास सांगाव पूर्वी शाळांमध्ये शुद्धलेखन दिले जात असे. मुले व्याकरणात काय चुका करतात हे शिक्षकांना त्यामुळे समजायचे आणि त्या चुका दूर केल्या जात असत. याचा फायदा व्याकरणशुद्ध लेखन आणि हस्ताक्षर सुधारण्यासाठी होतो. हाच उपाय आता मुलांबाबत अमलात आणा. कोणताही धडा शिकविल्यावर त्यातील शब्द मुलांकडून लिहून घ्यावेत. त्यातून त्यांना लेखनाचा सराव होऊन शब्दही लक्षात राहतात.वाचलेला धडा समजला, तरी तो शब्दांत मांडणे कठीण असल्याचे त्यांना समजते. प्रथम एक-दोन वेळा चुका झाल्या, तरी नंतर मुले व्यवस्थित उत्तरे लिहू लागतात आणि त्यांना शुद्धलेखनही समजायला लागते.


वेळेच्या मर्यादेचे पालन : तुम्ही मुलांना बोलून शिकवा किंवा सराव प्रश्नपत्रिका द्या; वेळेची मर्यादा पाळणे महत्त्वाचे असल्याचे त्यांना समजावून सांगा. ठरलेल्या वेळेतच काही करायचे आहे याची जाणीव झाल्यावर मुले वेळेबाबत काटेकोर होऊ लागतात आणि नंतर परीक्षेत त्यांना वेळ पुरतो. प्रारंभी त्यांना वेळेची मर्यादा पाळणे शक्य झाले नाही, तरी नंतर मात्र जमते. घरी लावलेल्या या सवयीचा फायदा त्यांना शाळेत होतो.

पुरेशी झोपसुद्धा गरजेची : गेली दोन वर्षे शाळेत जाण्याची धावपळ नसल्यामुळे मुलांचे वेळापत्रक त्यांच्या सोईने चालले होते. ती त्यांना हवे तेव्हा झोपत-उठत होती. पण आता शाळा सुरू झाल्या आहेत आणि परीक्षेला सामोरे जावयाचे असल्यामुळे या सवयी बदलायला हव्यात. पेपर व्यवस्थित लिहावयाचा असेल, तर किमान आठ तास झोपेची त्यांना आवश्यकता असते. पुरेशी झोप मिळाली तर केलेला अभ्यास मुलांच्या लक्षात राहून ती पेपर चांगला सोडवू शकतील. त्याचबरोबर या काळात मुलांच्या आहाराकडेही जास्त लक्ष द्या. त्यांना आरोग्यदायी आहार देण्याची आवश्यकता असते.

# ऑनलाइन लैंगिक शोषणाला मुले बळी पडत आहेत

बाल लैंगिक शोषण दूर करण्यात फेसबुक आघाडीवर आहे. फेसबुक दरवर्षी लाखो फोटो आणि व्हिडिओंची तक्रार करते. तथापि, जेव्हा व्यक्तीचे वय माहित नसते, तेव्हा ते प्रौढ असल्याचे गृहीत धरतात.या तक्रारींवरुन लैंगिक शोषणाला मुले मोठ्या प्रमाणात बळी पडत असल्याचे स्पष्ट होते.मेटाने आपल्या कंपन्या फेसबुक, इन्स्टाग्राम, मेसेंजर आणि व्हॉट्सॲपला तशा सूचना दिल्या आहेत. मात्र आजकाल मुले त्यांच्या वयापेक्षा मोठी दिसू लागली आहेत, असे अनेक अभ्यासांतून दिसून आले आहे. परिणामी, फेसबुकवरून अशा पोस्टची क्रमवारी लावण्यासाठी आणि काढून टाकण्याचे काम करणारे एक्सचेंजर या सर्व फोटोंची तक्रार करू शकत नाहीत. कॉर्पोरेट प्रशिक्षण दस्तऐवज आणि मुलाखतींनी हे उघड केले आहे. फेसबुक वय निर्धारित करण्यासाठी कालावधीचे टेनर यांनी सांगितलेले टप्पे फॉलो करते. ब्रिटिश बालरोग तज्ज्ञ डॉ. जेम्स एम. टेनर यांनी हे टप्पे बनवले आहेत.

वयात येताना व्यक्तीमध्ये होणाऱ्या बदलांच्या आधारे



त्यांनी हे ठरवले होते. या कालावधीच्या टप्प्यांनुसार १३ ते १४ वर्षांच्या मुलाचा पूर्ण विकास होऊ शकतो. लैंगिक शोषण ओळखण्यासाठी त्यांचा वापर करणे पूर्णपणे चुकीचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुले मोठी दिसत असल्यामुळे ती प्रौढ असल्याचे गृहीत धरले जाते, त्यामुळे त्यांच्या लैंगिक शोषणाची नोंद होत नाही. ॲपल, स्नॅपचाट आणि टिकटॉक यासारख्या कंपन्या लैंगिक शोषण सामग्रीची तक्रार करतात, ज्यामध्ये व्यक्तीचे वय स्पष्टपणे प्रकट केलेले नसते. त्याचबरोबर गुगल,

# येथे मगरींबरोबर घेतला जात होता ब्रेकफास्ट

**अमेरिकेत १९२० मध्ये कॅलिफोर्निया प्रांतात मगर संग्रहालय स्थापन करण्यात आले होते.या संग्रहालयात लोक मगरींबरोबर ब्रेकफास्ट घेत असत. येथे मुलांसाठी बागही होती. या बागेतही सुसरी-मगरींचे खेळ होत असत.**



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खासगी शाळेची मुले हुशार असतात हा गैरसमज

सर्वसाधारणपणे मूल अडीच-तीन वर्षांचं झाले की, पालकांना त्याच्या शाळेची काळजी लागते. उत्तम शाळेचा शोध सुरू होतो आणि बहुतांश पालक भरभक्कम शुल्क भरून एखाद्या खासगी शाळेची निवड करतात. फार कमी पालक सरकारी शाळेत आपल्या मुलांना पाठवण्याचा निर्णय घेतात. खासगी शाळेत शिकल्यानं आपलं मूल हुशार होईल, त्याचं भविष्य उज्ज्वल होईल, असा पालकांचा दृढ विश्वास असतो. मात्र, पालकांच्या या गृहीतकाला जोरदार धक्का देणारा एक निष्कर्ष नुकत्याच एका संशोधनातून पुढं आला आहे.खासगी शाळा मुलांना सर्वोत्तम शिक्षण देतील आणि त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी अधिक सक्षम करतील. हे गृहीतक ग्राह्य मानलं जावं, असा कोणताही निर्णायक पुरावा नसल्याचं या संशोधनात म्हटलं आहे.

न्यू इंग्लंड विद्यापीठातून शिक्षण आणि मानसशास्त्रात पीएच.डी. करत असलेल्या सॅली लार्सन आणि अलेक्झांडर फोर्ब्स यांनी याबाबत संशोधन केलं असून, हा संशोधन अहवाल द कॉन्व्हर्सेशन जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलिया आणि अन्य काही देशांमध्ये याबाबत संशोधन करण्यात आलं आहे. ऑस्ट्रेलियामध्ये नर्सरीपासून चौथीपर्यंतची ३० टक्के मुलं आणि पाचवी ते आठवीपर्यंतची ४० टक्के मुले खासगी शाळांमध्ये शिकतात. खासगी शाळांचे शुल्कही त्या चालविणाऱ्या संस्थांनुसार वेगवेगळे असते. मात्र इथे सर्व शाळांना कमी जास्त प्रमाणात सरकारी अनुदान मिळतं. या संशोधकांनी ऑस्ट्रेलियातील शाळांमधील मुलं आणि अन्य आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुलांचा अभ्यास केला असता असं दिसून आलं की, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीनुसार खासगी शाळांमध्ये शिकणारी मुले सार्वजनिक शाळांमधील मुलांपेक्षा वेगळी नाहीत.

एनएपीएलएएनमधील त्यांच्या स्कोअरमध्ये फार फरक नाही. कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे खासगी शाळेत जाण्याची शक्यता आणि शैक्षणिक सुविधांची उपलब्धता या दोन्हीशी संबंधित आहे. खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीमध्ये फरक दिसून येत असला, तरी मुलाची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी विचारात घेतल्यावर हा फरक फार ढोबळ असल्याचं जाणवतं. २०१८ मधील प्रोग्राम फॉर इंटरनॅशनल असेसमेंट चाचण्यांमध्ये सहभागी झालेल्या ६८ शिक्षणप्रणालींचे विश्लेषण केल्यानंतर खासगी शाळांमध्ये शिकणे नेहमीच उत्तम नसते, असं सिद्ध झालं असल्याचं या संशोधकांनी म्हटलं आहे.ओईसीडी देशांमध्ये आणि ४० शिक्षण व्यवस्थामध्ये करण्यात आलेल्याअभ्यासात, खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांनी सार्वजनिक शाळांमधील मुलांपेक्षा जास्त वाचन गुण मिळवले आहेत.

त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थिती गृहीत न धरता हे मूल्यांकन करण्यात आलं आहे. विद्यार्थी आणि शाळेची सामाजिक आणि आर्थिक स्थिती लक्षात घेऊन करण्यात आलेल्या मूल्यांकनानुसार, सार्वजनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांचे गुण खासगी शाळांच्या




मुलांपेक्षा जास्त असल्याचं स्पष्ट झालं. ऑस्ट्रेलियात खासगी शाळांना अधिक पाठिंबा दिला जात असून, त्यासाठी या शाळांमध्ये मुलांना सर्वोत्तम शिक्षण मिळत असल्याचा युक्तिवाद केला जातो.म्हणजेच खासगी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा वेग सरकारी शाळेतील मुलांपेक्षा चांगला आहे, असं गृहीत धरलं जातं. शाळेच्या प्रकारानुसार चार एनएपीएलएएन चाचणी वर्षांमध्ये (३, ५, ७ आणि ९ वर्षे वयात) विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पातळीत फरक पडतो का, हे तपासणारे हे पहिले संशोधन आहे, असा दावा संशोधकांनी केला आहे.आम्ही सार्वजनिक शाळा, खासगी शाळा, तसंच तिसऱ्या आणि पाचव्या वर्षात सार्वजनिक शाळेत आणि नंतर सातव्या आणि नवव्या वर्षी खासगी शाळेत शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या एनएपीएलएएन स्कोअरची तुलना केली.

नंतरच्या गटातील विद्यार्थ्यांनी चार चाचणी वर्षांमध्ये संख्यात्मक चाचण्या आणि वाचनात सर्वाधिक गुण मिळवले.

या गटाने सर्व वर्षांमध्ये खासगी शाळांमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा आणि सर्व वर्षांमध्ये सार्वजनिक शाळांमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा चांगले प्रदर्शन केले. परंतु, खासगी शाळेत जाण्यानं विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता वाढते, असा कोणताही पुरावा मिळालेला नाही, असं या संशोधकांनी म्हटलं आहे.हे उच्च कामगिरी करणारे विद्यार्थी खासगी शाळेत जाण्यापूर्वी सार्वजनिक शाळेत सर्वाधिक गुण मिळवत होते. त्यांना खासगी शाळांमध्ये पाठवल्याने त्यांच्या एनएपीएलएएन स्कोअरवर परिणाम झाला नाही.सार्वजनिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी खासगी शाळांमधील त्यांच्या समवयस्क विद्यार्थ्यांइतकीच प्रगती केली.यामुळं खासगी शाळेत विद्यार्थ्यांचा उत्तम शैक्षणिक विकास होतो, हा दावा फोल ठरतो, असा निष्कर्ष या संशोधकांनी नोंदवला आहे.


# बाळाचे बोलणे आईच्या मूडवर अवलंबून असते; पाहणीतील निष्कर्ष

बाळ केव्हा बोलायला सुरुवात करेल, हे आईचा मूड निश्चित करते. जर आई बाळाचा जन्म झाल्यावर दोन महिने उदास किंवा रागात असेल, तर बाळ ६ महिने आवाजसुद्धा ओळखू शकत नाही. बाळ खूपच उशिरा बोलायला लागते, असा निष्कर्ष जर्मनीच्या मॅस प्लॅंक इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन कॉग्निटिव्ह ॲण्ड ब्रेन सायन्सने पाहणी करून काढला आहे.बाळ सुरुवातीपासूनच सभोवतालचा आवाज ओळखण्याचा प्रयत्न करते.जर आई प्रसूतीनंतर वैफल्यग्रस्त असेल, तर त्यांचा विपरीत परिणाम बाळाच्या विकासावर होतो. अशा वेळी वडिलांची भूमिका महत्त्वाची ठरते. बाळासोबत जास्तीत जास्त वेळ घालविणे, त्याच्याशी बोबड्या भाषेत बोलणे आवश्यक ठरते. कारण उदास आईचा आवाज एकसारखा असतो. त्यामुळे बाळ आवाजातील फरक समजू शकत नाही. आवाज ओळखणे हा बाळाचा नैसर्गिक गुण आहे, जो आईचा मूडच विकसित करू शकतो. आईच्या मूडनुसार बाळ आवाजातील फरक समजता समजता शब्दही समजू लागतो.जर आई आनंदित असेल, तर व बाळाशी वेगवेगळ्या पद्धतीने बोलत असेल, तर बाळ लवकर बोलू लागते. असा दावा एफ यू बर्लिनमध्ये डेव्हलपमेंट इन चाईल्ड हुड अँड एडोलेन्सेसच्या प्रोफेसर गिझा सैद यांनी केला आहे. त्या म्हणतात, ज्यावेळी आई आनंदी असते त्यावेळी आवाजाचा टोन वेगवेगळा असतो. हे अंतर बाळ सहजच समजते. जर असे झाले नाही, तर



बाळ स्पीच डिसऑर्डरने पीडित होते. बाळ लवकर बोलत नसेल, तर बाळाला बोलते करण्याचा प्रयत्न करावा किंवा त्वरित इलाज करावा, असा सल्ला बालविकार सल्लागार डॉ. नेहा यांनी दिला आहे. बाळ २-४ वर्षांच्या दरम्यानही बोलू शकत नसेल तर, या वयात त्याचा इलाज सुरू करा. आई-वडिलांनी बाळाजवळ बसून मोठ्या आवाजात बोलावे व बाळाला बोलण्यासाठी प्रेरित करावे.बाळाशी बोबड्या पद्धतीने बोलावे. कारण तुम्ही जितके जास्त बोलाल, तसे बाळ प्रतिसाद देण्याचा प्रयत्न करील. बाळाशी बोलण्याची वेळ निश्चित करा. त्यांना काहीही प्रश्न विचारू द्या. संगीत, गाणे गा, बालगीत म्हणा. असे केल्यास बाळ बोलण्याचा प्रयत्न करू लागेल.

# अभ्यासाच्या दडपणाचे व्यवस्थापन मुलांना शिकवा



मुला-मुलींच्या क्षमता काय आहेत आणि त्यांच्याकडून आपण नेमकी कशाची अपेक्षा करतो आहोत, याचं भान पालकांनीही राखणं आवश्यक असतं. त्यासाठीच संवाद हवा असतो. अभ्यास, आवडी-निवडी, खेळ अशा सगळ्या विषयातली चर्चाही आवश्यक असते, तीही अनेक अर्थांनं. म्हणजे, ते होऊ शकलं तर अभ्यासही चांगला होऊ शकतो आणि मुख्य म्हणजे कोणत्याही दडपणाशिवाय होऊ शकतो. अपेक्षा जास्त आहेत, हे दडपण मानळीकही असतंच आणि त्याचा परिणाम इतरही गोष्टींवर होत राहतो. ते टाळायचं असेल तर पालक आणि मुला-मुलींचा संवाद हवा.अतिअपेक्षांनी कुणावरही दडपण येऊ शकतं. मग तो शाळेत जाणारा मुलगा किंवा मुलगी असो किंवा एखादा क्रिकेटपटू.

दडपण आलं की, नैसर्गिक खेळ बाजूला पडतो तसेच नैसर्गिक बुद्धिमत्तेचाही उपयोग होत नाही. त्या दडपणाखाली नैसर्गिक क्षमता दबून जातात; म्हणून संवाद ठेवला पाहिजे. अपेक्षा व्यक्त करताना, क्षमतांशी त्यांचं संतुलनही राखलं गेलं पाहिजे; तरच अभ्यास चांगला होऊ शकतो.दडपण येणं हे स्वाभाविक आहे. पण ते हाताळणं मात्र आपल्याच हाती असतं. शक्य झालं तर ते दडपण हाताळण्याचं कौशल्य आपल्या मुला-मुलींना शिकवता आलं पाहिजे. त्यासाठी त्या विषयातील तज्ज्ञ किंवा समुपदेशकांचीही मदत घेता येऊ शकते. कारण, अतिअपेक्षांचं हे दपडण जसं मुला- मुलींवर येऊ शकतं तसेच ते पालकांवरही येऊ शकतं. आणि दडपण आलं तर कुठलंच काम नीट होत नाही, झालंच तर आनंद देत नाही. म्हणूनच, हे सगळं टाळून, चांगलं काहीतरी घडविण्यासाठी दडपणाशिवाय मुला-मुलींनी अभ्यास करावा, ही खरी अपेक्षा असायला हवी.

# घरातून दोघं बाहेर आले अन् मम्मी बिछान्यावर पडलेली; महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या संशयास्पद मृत्यूने महाराष्ट्र हादरला



**अमरावती** : शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत महिला पोलिस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सायंकाळी सात वाजताचे सुमारास उघडकीस आली. आशा राहुल धुळे-तायडे, वय ३८ वर्ष, रा. गुरुकृपा कॉलनी, वडाळी, अमरावती, असे मृत पोलिस महिलेचे नाव आहे. ही हत्या असावी असा संशय व्यक्त होत आहे.आशा यांचे पती राहुल धुळे हे राज्य राखीव पोलिस दल क्र. ९ मध्ये शिपाई या पदावर कार्यरत आहेत. गेल्या १३ तारखेपासून आशा या रजेवर होत्या. त्यांना चौदा वर्षांचा एक मुलगा आणि सात वर्षांची एक मुलगी आहे.शुक्रवारी सायंकाळी सहा वाजताचे सुमारास त्या घरात एकट्या होत्या. पती, मुलगी व मुलगा बाहेर होते. मुलगा सायंकाळी सहा वाजता घरात जात असताना त्यांच्या घरातून दोन व्यक्ती बाहेर येत असल्याचे त्याला दिसून आले. यानंतर त्याने घरात प्रवेश केला असता त्याची आई बिछान्यावर बेशुद्ध अवस्थेत पडली होती. त्याने आईला उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु आईने प्रतिसाद दिला नाहीघाबरलेल्या मुलाने तत्काळ वडिलांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार रोशन शिरसाट व पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. महिलेच्या गळ्यावर व्रण असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले आहे. या घटनेमुळे गुरुकृपा कॉलनीसह शहरात मोठी खळबळ उडाली आहे.दुसरीकडे, रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील कणघर येथे दोन अल्पवयीन मुलांनी वृद्ध महिलेची गळा आवळून हत्या केली असल्याची घटना ताजी असतानाच म्हसळा येथील मोहमद असगर अली परदेशी (१८) याने त्याचे आजोबा शौकत अली हुसेनमीयाँ परदेशी (७२) यांची निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. बाहेरील अज्ञात व्यक्तीने आजोबांची हत्या केल्याचा बनाव नातवाने केला होता.मोहम्मद परदेशी आणि आजोबा शौकत अली यांच्यामध्ये नेहमी वाद होत व्हायचा. ३१ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आजोबा शौकत अली परदेशी हे त्यांच्या घरातील खालच्या खोलीत एकटेच झोपले होते, तर इतर सदस्य घरातील माळ्यावर झोपले होते. हीच संधी साधून नातवाने लोखंडी रॉडने आजोबा शौकत अली परदेशी यांच्या डोक्यात जोरदार प्रहार केला व सुरीने गळ्यावर वार करून दोन्ही मनगटाच्या नसा कापून त्यांची हत्या केली. त्याने आजोबांची हत्या केल्याचे कबूल केले.

# लग्नाआधी आई-बाबा होणाऱ्या जोडीची बिन लग्नाची गोष्ट...



**मुंबई:** प्रिया बापट आणि उमेश कामत ही मराठी मनोरंजन विश्वातील एक आवडती जोडी आहे. मालिका, चित्रपट, नाटक ते ओटीटी प्लॅटफॉर्मवर या खऱ्या आयुष्यातील कपलने विविध प्रोजेक्ट एकत्र केले आहेत. मात्र, जवळपास १२ वर्षांपासून ते कोणत्याही सिनेमात एकत्र दिसले नव्हते. चाहत्यांची ही इच्छा आता पूर्ण होणार असून, त्यांचा नवा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाच्या नावासारखाच पहिला टीजरही हटके आहे. नुकताच प्रिया-उमेश यांच्या या चित्रपटाचा टीजर रीलिज झाला. यांच्या या सिनेमाचे नाव बिन लग्नाची गोष्ट असे असून, नात्यांबद्दलचा एक वेगळा दृष्टिकोन दाखवणारा हा सिनेमा आहे. चित्रपटाच्या टीझरमध्ये, लग्न न करता एकत्र राहणाऱ्या जोडप्याची कथा आहे. प्रिया आणि उमेश यांच्यातील केमिस्ट्री यामध्ये दिसून आली. ते लग्नाआधीच आई-वडील होणार आहेत. या टीजरमध्ये गिरीश ओक आणि निवेदिता सराफ यांच्या एन्ट्रीनंतरही वेगळा ट्वीस्ट पाहायला मिळाला. हा चित्रपट नात्यांच्या पारंपरिक कल्पनांपेक्षा काहीसा वेगळा आहे, ज्यात लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या विचारांवर भाष्य करण्यात आले आहे. लग्नाआधी आई-बाबा होणाऱ्या उमेश आणि प्रियाची तारांबळ उडालेली पाहायला मिळते.चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य इंगळे यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, हा चित्रपट एक वेगळी गोष्ट सांगतो. यात नात्यांमधील भावनांचा प्रवास आहे. उमेश आणि प्रिया यांनी खूप छान काम केले आहे. त्यामुळे ही कथा अधिक खरी वाटते. तर निर्माते नितीन वैद्य म्हणाले की, चित्रपटाची कथा वेगळी आहे, पण ती आपल्या सर्वांना कनेक्ट करणारी आहे. निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांच्यासारख्या कलाकारांमुळे कथेला इमोशनल टच मिळतो. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल.या चित्रपटात प्रिया बापट, उमेश कामत, निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. समीर कुलकर्णी यांची कथा असून आदित्य इंगळे यांनी दिग्दर्शन केले आहे. बिन लग्नाची गोष्ट हा चित्रपट गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स या बॅनरखाली सिनेमाची निर्मिती करण्यात आली असून तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य हे निर्माते आहेत.

## शिवथरघळ-ठाणे एसटीचा अपघात, बस आणि आयशर टेम्पोची समोरासमोर धडक, अपघाताचे कारण समोर...

रायगड : रायगडमधील रोहा तालुक्यातील नागोठणे जवळ एसटी बस आणि आयशर टेम्पोची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात एसटीमधील प्रवांशासहीत टेम्पो चालक जखमी झाले आहेत. पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रोहा तालुक्यातील नागोठणे नजिक कोलेटी येथे एसटी बस व मालवाहू आयशर टेम्पो यांच्यात समोरासमोर धडक होऊन आयशर टेम्पो चालकासहित अकरा जण जखमी झाले असल्याची माहिती नागोठणे पोलिसांनी दिली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात झाला. शिवथरघळ-ठाणे असा प्रवास करणाऱ्या एसटी बसचा चालक दिनकर डोंगरे (३६) हा ठाणे आगाराची एस.टी. बस शिवथरघळ ते ठाणे अशी ५० प्रवासी घेऊन ठाण्याच्या दिशेने जात होता. ज्या ठिकाणी अपघात झाला त्याठिकाणी एकेरी रोड असल्याचे माहिती असूनही, त्याने बस अतिवेगाने चालवून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या आयशर टेम्पोला समोरासमोर धडक दिली.या अपघातात टेम्पोच्या केबिनला मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन केबिनमध्ये अडकून पडलेला टेम्पो चालक दिनेश यादव हा गंभीर जखमी झाला. व त्याच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. टेम्पोत अडकलेल्या चालकाला स्थानिक नागरिकांनी लोखंडी साखळीच्या सहाय्याने टेम्पोचा आतील भाग मागे ओढून मोकळे केले. ही दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि.१) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.या भीषण अपघातात आयशर टेम्पो चालक दिनेश वासुदेव यादव याच्यावर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. आदित्य शिरसाट यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तसेच एस टी बस मधील जखमी प्रवाशांमध्ये,यांच्यासहित दहा प्रवासी जखमी झाले असून, त्यांना किरकोळ दुखापती व मुकामार लागला आहे. जखमी प्रवाशांवर प्राथमिक आरोग्य केंद्र नागोठणे येथे उपचार सुरू आहेत. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन कुलव यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

# रिपब्लिकन सेनेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**जनसंचलन/बुलडाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती रिपब्लिकन सेनेच्या वतीने साजरी करण्यात आली बुलडाणा जिल्हाध्यक्ष विजयकांत गवई यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्य व विचारांना विनम्र अभिवादन केले. शोषीत पीडित कामगार श्रमिक आणि वंचितांच्या आवाजाला लेखणी व गीतांच्या माध्यमातून बुलंद करणारे आपल्या साहित्याच्या माध्यमातून सामाजिक विषमतेवर परखडपणे भाष्य करणारे अन्यायाचा वाचा फोडणारे थोर विचारवंत महाराष्ट्रभूषण साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन, तळागाळातील समाज घटकाला स्वाभिमानाने जगता यावे म्हणून अण्णाभाऊ साठे यांनी परिवर्तनवादी विचार जनमानसात रुजवले देशाच्या स्वतंत्रलढ्यापासून संयुक्त महाराष्ट्र आंदोलन त्यांनी मानवतेसाठी व शोषणमुक्तीसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले या थोर समाजसुधारकाला भारत देशाचा भारतरत्न पुरस्कार मिळालाच हवा अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने मुख्यमंत्री यांना केली होती. लेखणीच्या माध्यमातून हक्क समाजाला मिळवून देणारे लोकनायक लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीदिनी कोटी कोटी अभिवादन करण्यात आले. अभिवादन करते रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष ब्रह्मा साळवे, महासचिव सलीम शेख, जिल्हा कामगार अध्यक्ष सुरेश इंगळे, शहर उपाध्यक्ष सतीश पवार, सौरभ बावस्कर, दीपक तायडे, स्वराज क्षिरसागर,विकी निकाळजे, विशाल काकफळे, संतोष बावस्कर जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते आणि समाज बांधव उपस्थित होते

# पी एम सन्मान निधीचा २० हप्ता २ ऑगष्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार वितरित... !

**जनसंचलन/बुलढाणा**

पी एम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या २ ऑगस्टला हस्तांतरित होणार आहे त्यानिमित्य बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे होणाऱ्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित राहणार आहेत.. पीक लागवडीच्या काळात शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने पी एम किसान सन्मान योजना केंद्र सरकारच्यावतीने कार्यान्वित करण्यात आली आहे या योजनेअंतर्गत दरवर्षी शेतकऱ्यांना दोन हजाराचे तीन टप्पे असे एकूण ६००० रुपये देण्यात येतात पी एम किसान योजनेचा २० टप्पा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ ऑगस्टला वितरित केल्या जाणार आहे त्यानिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्रामध्ये सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित होणाऱ्या शेतकरी सन्मान निधी वाटप कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्रात केल्या जाणार आहे. त्याच प्रमाणे कार्यक्रमा मध्ये शेतकऱ्यांना सुधारित सोयाबीन लागवड तंत्रज्ञान, हुमणी कीड ओळख व एकात्मिक व्यवस्थापन आणि सघन आंबा लागवड तंत्रज्ञान इत्यादी विषयावर मार्गदर्शन सुद्धा करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव




जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील आमदार संजय गायकवाड आमदार धीरज लिंगाडे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाला जास्ती जास्त शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ अमोल झापे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा श्री मनोज ढगे, प्रकल्प संचालक आत्मा श्री पुरुषोत्तम उन्हाळे यांनी केले आहे

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**जनसंचलन/बुलडाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड सुरेश थोरात, अजिंक्य घोडके, डॉ. जयश्री ठाकरे, तहसीलदार वृषाली केतकर, विजय सवडे यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.




आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | गुंतवणूक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षांपर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# जिजामाता महाविद्यालयात मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संपन्न...

जनसंचलन/बुलढाणा

पुराभिलेख संचनालय, महाराष्ट्र शासन,मुंबई व इतिहास विभाग,जिजामाता महाविद्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी थाटात संपन्न झाले.

मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग दिनांक ३१ जुलै २०२५ ते ९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवई, उद्घाटक म्हणून मराठा संशोधक ग्रंथ मंडळ संस्थापक अध्यक्ष प्रमोद टाले, पुराभिलेख संचलनालय,मुंबई येथील मोडी लिपी प्रशिक्षक तज्ञ अमोल महल्ले सर तसेच दुसरे मोडी लिपी प्रशिक्षक तज्ञ वैभव फुलकरी सर,महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून विजयकुमार ठाकूर सर तसेच इतिहास विभागाचे प्रा.डॉ. नामदेव ढाले, प्रा. डॉ.सुबोध चिंचोले मंचावर उपस्थित होते.

सदर उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटक प्रमोद टाले यांनी अतिशय मार्मिकपणे आपल्या उद्घाटकीय भाषणातून मोडी लिपीचा संपूर्ण इतिहास, महत्व तसेच या लिपीचा अभ्यास केल्यास पुढील अनेक घटनांचा इतिहास अतिशय वस्तुनिष्ठपणे समोर येईल असे प्रतिपादन त्यांनी केले.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवई यांनी आपल्या अध्यक्ष भाषणातून मोडी लिपी वर्तमान व भावी पिढीसाठी किती महत्त्वाचे आहे याबाबत सविस्तरपणे त्यांनी मांडणी केली.

मोडी लिपी प्रशिक्षक तज्ञ अमोल महल्ले सर यांनी आपल्या मार्गदर्शक भाषणातून मोडी लिपी वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोडी लिपी वर्गाचे महत्व व उद्देश स्पष्ट केले.

प्रास्ताविक भाषणातून प्रा. डॉ. नामदेव ढाले यांनी मोडी आपल्या परिसरातील जनतेला मोडी लिपी मोडी लिपी शिकण्याची सुवर्णसंधी पुराभिलेख संचनालय, महाराष्ट्र शासन यांनी आपल्याला दिलेली आहे.आपण सर्वांनी या संधीचा फायदा घेतलाच पाहिजे तसेच शासनाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग जिजामाता महाविद्यालयाला दिला याबाबत शासनाचे धन्यवाद मानले.

उद्घाटन कार्यक्रमाचे अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने प्रा. श्रीकांत तळेकर सर यांनी संचालन केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. मनोज डांगे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशिक्षणार्थी महाराष्ट्र मराठा सोयरिकचे संस्थापक सुनीलराव जवंजाळ पाटील, प्रा. दीपक लहासे, प्रथमेश काळे, रुपेश कंकाळ,डॉ. उमेश राऊत ,प्रा. चंद्रशेखर भांडतकर व मोडी लिपी प्रवेशित प्रशिक्षणार्थींनी अथक परिश्रम घेतले. या प्रशिक्षणात आपल्या परिसरातील शासकीय कार्यालयातील तसेच अशासकीय कर्मचारी महाविद्यालयातील विद्यार्थी असे एकूण ४४ जणांनी यामुळे लिपी प्रशिक्षण वर्गात प्रवेशघेतलेलाआहे

# बुलढाणा तालुका भारतीय जनता पार्टी मासिक सभा संपन्न!

जनसंचलन/बुलढाणा




आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी बुलढाणा ग्रामीण च्या वतीने संघटनात्मक पूर्व तयारीचा आढावा घेण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज बुलढाणा येथे भारतीय जनता पार्टी बुलढाणा ग्रामीण मंडळाची संघटनात्मक बैठक पार पडली. सुरुवातीला लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. या बैठकीमध्ये आगामी निवडणुकांच्या दृष्टीने भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक तयारीचा आढावा घेण्यात आला व आवश्यक त्या सूचना करून कार्यकर्त्यांना निवडणूकांमध्ये लोकसभा विधानसभा प्रमाणेच महाविजय मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा करण्याचे आवाहन करण्यात आले. येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असल्याकारणाने सर्वांना झोकून देऊन काम करावे लागेल. आपण एका राष्ट्रीय पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असल्यामुळे जनता नक्कीच आपल्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे आता जनतेच्या साथीने पुन्हा एकदा आगामी निवडणूकांमध्ये नेत्रदीपक कामगिरी करून जनसेवेसाठी सज्ज व्हावे लागेल त्यासाठी दिवस रात्र एक करून आपल्या पक्षाला विजयी करण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे असे आवाहन तालुकाध्यक्ष सतिश भाकरे पाटील यांनी उपस्थित भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधतांना केले. यावेळी या बैठकीला बुलढाणा ग्रामीण मधील विविध भागातील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये सर्वांनी संघटन मजबूत करण्यावर भर देण्याचे ठरविले तसेच येणाऱ्या काळात पक्षाला चांगले यश मिळवण्यासाठी सगळ्यांनी संघटित होऊन पक्ष वाढवण्यासाठी काम करण्याचे ठरले. शेवटी भाजपा नेते तथा माजी मंत्री आ.संजूभाऊ कुटे यांच्या मातोश्रींचे वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाल्याबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# महसूल विभाग हा शासनाचा आधारस्तंभ - पालकमंत्री मकरंद पाटील

जनसंचलन/बुलढाणा

महसूल विभागाच्या कार्यक्षमतेचा गौरव करत, जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी महसूल दिनानिमित्त विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांचे मनोबल वाढवले. महसूल विभाग हा शासनाचा कणा असून, जनतेला पारदर्शक व तत्पर सेवा देण्यासाठी या विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले. महसूल दिनाचे औचित्य साधून जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी आज शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे समस्या जाणून घेतल्या. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याचे निर्देश, पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी यावेळी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित महसूल दिन कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर तांबे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, डॉ. जयश्री ठाकरे, समाधान गायकवाड, उपमुख कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल व विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

महसूल दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना महसूल विभागाच्या कार्याची सखोल प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, ङ्कशासन आणि जनतेच्या दरम्यान विश्वासाचे सेतू बांधण्याचे काम महसूल विभाग करत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे हक्क, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, विविध शासकीय योजना आणि नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित निर्णय या विभागाच्या माध्यमातून घेतले जातात. त्यामुळे शासकीय कामामध्ये नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक परिणामकारक बनवण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. पालकमंत्र्यांनी महसूल कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचे कौतुक करत, पारदर्शकता, जबाबदारी आणि तत्परता या गुणांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच शासकीय कामकाज करताना पालकमंत्री म्हणून मी, सदैव अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले की, महसूल विभाग विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत असून शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडवले जात आहेत. दि. ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत नागरिकांच्या तक्रारीवर तात्काळ उपाय केले जातील, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे, शेतकऱ्यांचे कामे प्राधान्याने, पारदर्शक व गतिमानतेने करा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी महसूल दिनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला ई महसूल प्रणाली माहिती पुस्तिकाचे ऑनलाईन विमोचन पालकमंत्री व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी वनहक्क पट्टे, नझूल भूखंड वाटप, जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना सातबारा वितरण आदींचे वाटप करण्यात आले.

उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रास्ताविकात महसूल दिन व सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तहसिलदार वृषाली केसकर यांनी तर आभार उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८